# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २३.०६.२०२६

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (१७.०६.२०२६ ते २३.०६.२०२६) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२४.०६.२०२६ ते २८.०६.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | दिनांक | | २४ | २५ | २६ | २७ | २८ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | १.० | पाऊस (मिमी) | | १५.४ | १८.० | २५.० | ३५.० | १८.० |
| ३५.० | ३४.६ | ३३.२ | ३३.५ | ३४.५ | ३५.० | ३१.२ | कमाल तापमान (अं.से.) | | ३०.० | ३०.० | ३१.० | ३१.० | ३०.० |
| २४.० | २३.० | २३.० | २२.८ | २२.४ | २४.४ | २३.० | किमान तापमान (अं.से.) | | २२.० | २२.० | २३.० | २३.० | २३.० |
| ६ | ६ | ५ | ४ | ८ | ६ | ८ | स. | ढग स्थिती (आकाश) | ७ | ८ | ७ | ७ | ६ |
| ४ | ५ | ७ | ५ | ५ | ८ | | दु. | | | | | | |
| ८४ | ८१ | ८३ | ८४ | ८६ | ७७ | ८५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ८४ | ८५ | ८५ | ८५ | ८५ |
| ५० | ५५ | ४८ | ४८ | ५० | ५५ | ८७ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ६८ | ६९ | ७६ | ६५ | ६८ |
| ७.७ | ४.३ | ४.० | ३.८ | ३.७ | ३.३ | ६.४ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | | १४ | १२ | १२ | १० | ९ |
| नै. | नै. | नै. | नै. | वा. | नै. | प.नै. | स. | वाऱ्याची दिशा | २२९ | २४९ | २५५ | २५५ | २७७ |
| द.नै. | वा. | प.वा. | प.वा. | नै. | वा. | प.वा | दु. | | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| १.० | १२४.२ | ८ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये २४, २५, २६, २७ व २८ जून रोजी आकाश ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये २४, २५ व २८ जून रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची तसेच २६ व २७ जून रोजी काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये २८ जून पर्यंत कमाल तापमान ३०.० ते ३१.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान २२.० ते २३.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ८४ ते ८५%, दुपारची सापेक्ष आद्रता ६५ ते ७६% तसेच वाऱ्याचा वेग ताशी ०९ ते १४ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक २६ जून ते २ जुलै दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी ते सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. |

| हवामान इशारा | दिनांक | विभाग | इशारा |
|---|---|---|---|
| हवामान इशारा | २३.०६.२६ | घाट भाग | तुरळक ठिकाणी जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| | | कोल्हापूर जिल्हा | कोल्हापूर जिल्ह्यामध्ये तुरळक ठिकाणी मेघगर्जना व विजांचा कडकडाट व ताशी ४० ते ५० किमी वेगाच्या वाऱ्यासह मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| | २४.०६.२६ | घाट भाग | तुरळक ठिकाणी मेघगर्जना व विजांचा कडकडाट व ताशी ४० ते ५० किमी वेगाच्या वाऱ्यासह मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| | | कोल्हापूर जिल्हा | कोल्हापूर जिल्ह्यामध्ये तुरळक ठिकाणी मेघगर्जना व विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| | २५.०६.२६ | घाट भाग | तुरळक ठिकाणी जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| | | कोल्हापूर जिल्हा | कोल्हापूर जिल्ह्यामध्ये तुरळक ठिकाणी मेघगर्जना व विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| | २६.०६.२६ | घाट भाग | तुरळक ठिकाणी जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| | | कोल्हापूर जिल्हा | कोल्हापूर जिल्ह्यामध्ये तुरळक ठिकाणी मेघगर्जना व विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| | २७.०६.२६ | घाट भाग | तुरळक ठिकाणी जोरदार स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| | | कोल्हापूर जिल्हा | कोल्हापूर जिल्ह्यामध्ये तुरळक ठिकाणी मेघगर्जना व विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | | ❖ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " |

# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

| | | |
|---|---|---|
| | | मेघदूत" अँड्रॉइड ॲप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड ॲप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>❖ **शेतकरी बांधवांनी ८० ते १०० मिमी पाऊस होईपर्यंत पेरणीची घाई करू नये** |
| संदेश | | **पक्व झालेल्या फळे तसेच भाजीपाला पिकांची काढणी करावी व काढणी केलेला शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा** |
| भात | रोपवाटिका | ➢ खरीप हंगामामध्ये भाताची लागवड करण्यासाठी रोपवाटिका तयार करणेकारिता गादी वाफे तयार करून घ्यावेत.<br>➢ १ मी. रुंदीचे, १५ सें.मि. उंचीचे आणि आवश्यकतेनुसार लांबीचे गादीवाफे तयार करावेत. १ हेक्टर क्षेत्रावर भात लागवडीसाठी १० गुंठे क्षेत्रावरील रोपवाटिका पुरेशी होते.<br>खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी दर्जेदार व प्रमाणित बियाण्याचे नियोजन करावे.<br>**वाणांची निवड :** हळवा: कर्जत१८४, रत्नागिरी -१,कर्जत-४, फुले राधा<br>➢ निमगरवा: फुले समृद्धी<br>➢ गरवा: रत्नागिरी -२ कर्जत-२<br>➢ सुवासिक वाण: बासमती-३७०, इंद्रायणी, भोगावती, सुगंधा<br>➢ संकरीत : सह्याद्री -१, सह्याद्री -४, सह्याद्री -५ |
| नाचणी | पेरणीपूर्व तयारी | ➢ शेतीची पूर्वमशागतीची कामे नांगरणी, कुळवणी व शेणखत मिसळून घ्यावे.<br>➢ रोपवाटीकेसाठी गादीवाफे तयार करून घ्यावेत<br>➢ रोपवाटिकेसाठी वाफे तयार करताना, १ गुंठा क्षेत्रासाठी २५० किलो शेणखत चांगल्याप्रकारे जमिनीत मिसळावे |
| ऊस | वाढीची अवस्था | ➢ हुमणी किडीच्या नियंत्रणासाठी प्रकाश सापळयांचा वापर करावा.<br>➢ ऊस पिकामध्ये तणनियंत्रण करावे. |
| टोमॅटो | वाढीची अवस्था | ➢ मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, मध्यम पाऊस आणि ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता असल्याने रोपे उन्मळून पडू नये म्हणून काठीच्या किंवा बांबूच्या सहाय्याने आधार द्यावा. |
| केळी | वाढीची अवस्था | ➢ मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, मध्यम पाऊस आणि ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता असल्याने केळी झाडे उन्मळून पडू नये म्हणून काठीच्या किंवा बांबूच्या सहाय्याने आधार द्यावा. |
| सोयाबीन | पेरणीपूर्व | **वाणांची निवड :** फुले दूर्वा, फुले किमया (केडिएस ७५३), फुले संगम (केडिएस ७२६), फुले अग्रणी (केडिएस ३४४), फुले कल्याणी (डिएस २२८), जे.एस.-३३५ |
| भुईमूग | पेरणीपूर्व | **वाणांची निवड :** फुले उन्नती, फुले धनी, फुले मोरणा ,फुले वारणा |
| चवळी | पेरणीपूर्व | **वाणांची निवड :** फुले रुख्मिणी, फुले सोनाली |
| मूग | पेरणीपूर्व | **वाणांची निवड :** उत्कर्ष, फुले चेतक, विराट, फुले सुवर्ण |
| उडीद | पेरणीपूर्व | **वाणांची निवड :** पिकेव्ही ब्लॅक गोल्ड, फुले वसू, फुले राजन |
| पशुधन | वाढीची | ➢ जनावरांच्या पिण्यात दूषित किंवा गाळ मिश्रण पाणी जाणार नाही याची काळजी घ्यावी.<br>➢ जनावरांची रोग प्रतिकारशक्ती वाढवावी. जेणेकरून जंतांच्या वाढीला आळा बसतो व त्यांचे नियंत्रण होते. याकरिता जनावरांना उत्तम संतुलित आहार द्यावा. जनावरांचा गोठा स्वच्छ, कोरडा व हवेशीर ठेवणे व वेळोवेळी निर्जंतुकीकरण करणे महत्त्वाचे आहे. औषधे देतांना औषध योग्य मात्रेतच द्यावे.<br>➢ जनावरांना मोकळ्या जागेत बांधू नये. त्यांना गोठा, शेड किंवा मजबूत इमारतीत ठेवावे.<br>➢ पावसाचे वातावरण आणि विजेचा गडगडाट होत असल्यास, शेतातील कामकाज त्वरित थांबवून जनावरांना बंदिस्त आणि सुरक्षित ठिकाणी हलवावे. |

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर
दि. : २३.०६.२०२६

स्वाक्षरीत
प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा
सहयोगी संशोधन संचालक,
विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर